आकाशवाणी मुंबई

राष्ट्रीय बातमीपत्र -दुपारी १.३०वाजता

१३ जानेवारी २०२५ - सोमवार

**<u>ठळक बातम्या</u>**

- श्रीनगर - सोनमर्ग रस्त्यावरच्या बोगद्याचं प्रधानमंत्र्यांच्या हस्ते उद्घाटन

- प्रधानमंत्री नरेंद्र मोदी येत्या बुधवारी महाराष्ट्राच्या दौऱ्यावर येणार

- जगातला सर्वात मोठा सांस्कृतिक आणि आध्यात्मिक मेळावा महाकुंभ प्रयागराजमधे सुरु

- देशभरात लोहडी, भोगी, माघ बिहू इत्यादी सुगीच्या सणांचा उत्साह

**आणि**

- खो-खो विश्वचषक स्पर्धा आजपासून नवी दिल्लीत रंगणार

**<><><><><>**

जम्मू काश्मीर मधल्या सोनमर्ग बोगद्याचं उद्घाटन आज प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या हस्ते झालं. या बोगद्यामुळे श्रीनगर आणि सोनमर्ग दरम्यान बारमाही रस्ता उपलब्ध होईल. सुमारे साडेसहा किलोमीटर लांबीच्या सोनमर्ग बोगदा प्रकल्पासाठी २ हजार ७०० कोटी रुपयांपेक्षा जास्त खर्च आला असून हा बोगदा भूस्खलन आणि हिमस्खलनप्रवण रस्ते टाळून लडाखशी अखंड संपर्क निर्माण करणार आहे. यामुळे सोनमर्ग इथं हिवाळी

पर्यटन, साहसी खेळांना प्रोत्साहन मिळेल आणि स्थानिकांना रोजगार मिळेल. तसंच श्रीनगर आणि लडाख दरम्यान प्रवासाच्या वेळात बचत होईल. प्रधानमंत्र्यांनी यावेळी बांधकामावर कार्यरत अधिकारी, तंत्रज्ञ आणि अभियंत्यांशी संवाद साधला. उद्घाटनानंतर सोनमर्ग इथे प्रधानमंत्र्यांची जाहीर सभा होत आहे.

<><><><><>

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी उद्या भारतीय हवामान विभागाच्या १५०व्या स्थापना दिन कार्यक्रमात सहभागी होणार आहेत. नवी दिल्लीतल्या भारत मंडपम् इथं होणाऱ्या या कार्यक्रमात प्रधानमंत्री 'मिशन मौसम'चा प्रारंभ करतील. आपल्या देशाला हवामानाबाबत सतर्क आणि हवामान बदलाबाबत स्मार्ट बनवणं, हा मिशन मौसमचा उद्देश आहे. प्रधानमंत्री या कार्यक्रमात भारतीय हवामान विभाग दृष्टीकोन-२०४७ दस्तऐवज देखील जारी करतील. या दस्तऐवजात हवामानाचा अंदाज आणि व्यवस्थापन तसंच हवामानबदल कमी करण्याच्या योजनांचा समावेश आहे. प्रधानमंत्री यावेळी उपस्थितांना संबोधितही करणार आहेत. भारतीय हवामान विभागाच्या १५०व्या स्थापना दिनानिमित्त देशभरात विविध कार्यक्रमांची मालिका आयोजित करण्यात आली आहे.

<><><><><>

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी येत्या बुधवारी महाराष्ट्राच्या दौऱ्यावर येणार आहेत. या दौऱ्यात प्रधानमंत्र्यांच्या हस्ते मुंबईतल्या डॉकयार्ड इथं

नौदलाच्या ३ युद्धनौका आयएनएस सुरत, आयएनएस निलगिरी आणि आयएनएस वाघशीर राष्ट्राला अर्पण करण्यात येणार आहेत. या ३ युद्धनौका नौदलात सामील होणं हे संरक्षण उत्पादन आणि सागरी सुरक्षा क्षेत्रात जागतिक नेतृत्व करण्याच्या दृष्टीनं भारताचं आणखी एक पाऊल आहे. आयएनएस सुरत ही जगातल्या सर्वात मोठ्या आधुनिक विध्वंसक युद्धनौकांपैकी एक आहे. आयएनएस निलगिरीचं डिझाईन भारतीय नौदलाच्या युद्धनौका डिझाईन ब्युरोनं तयार केलं आहे. आयएनएस वाघशीर या पाणबुडीची निर्मिती फ्रान्सच्या नौदलाच्या सहकार्यानं करण्यात आली आहे.

याशिवाय, प्रधानमंत्री नवी मुंबईत खारघर इथं इस्कॉनच्या श्री श्री राधा मदनमोहन मंदिराचं उद्घाटनही करतील.

**<><><><><>**

देशाच्या उत्तरेकडील सीमेवरील परिस्थिती संवेदनशील असली तरी स्थिर आहे, अस लष्करप्रमुख उपेंद्र द्विवेदी यांनी सांगितलं आहे. कोणत्याही परिस्थितीला तोंड देण्यासाठी सैन्य सज्ज असून सीमाभागात पायाभूत सुविधा मजबूत करणं हे भारतीय लष्कराचं उद्दिष्ट आहे, असं द्विवेदी म्हणाले. ते आज नवी दिल्लीत पत्रकार परिषदेत बोलत होते. जम्मू काश्मीरमधली परिस्थिती नियंत्रणात असून केंद्रशासित प्रदेश दहशतवादापासून मुक्त होत पर्यटन व्यवसायाकडे जात आहे. गेल्यावर्षी मारल्या गेलेल्या दहशतवाद्यांपैकी साठ टक्के पाकिस्तानी होते, असं द्विवेदी यांनी सांगितलं.

जम्मू काश्मीरमध्ये हिंसक कारवायांचं प्रमाण घटलं असून इथले नागरिक शांततेच्या बाजूने आहेत, असंही ते म्हणाले.

**<><><><>**

परराष्ट्र व्यवहार मंत्री डॉ एस जयशंकर आजासून ३ दिवसांच्या स्पेनच्या दौऱ्यावर आहेत. परराष्ट्रमंत्री म्हणून त्यांचा हा पहिलाच स्पेन दौरा आहे. या भेटीदरम्यान ते स्पेनचे परराष्ट्रमंत्री मॅन्युएल अल्बरेस यांच्या बरोबर द्विपक्षीय संबंध, प्रादेशिक तसंच दोनही देशांसाठी महत्वाच्या जागतिक मुद्यांवर चर्चा करतील. ते स्पॅनिश राजदूतांच्या ९ व्या वार्षिक परिषदेला संबोधित करतील तसंच भारतीय समुदायाशी संवाद साधतील.

**<><><><>**

महाकुंभ मेळ्याला आजपासून उत्तर प्रदेशात प्रयागराज इथं पौष पौर्णिमेच्या पहिल्या अमृत स्नानाने भव्य आध्यात्मिक मेळाव्याची सुरुवात झाली. २६ फेब्रुवारीपर्यंत चालणाऱ्या या महाकुंभात सहभागी होण्यासाठी लाखो भाविक तिथं जमले असून आज ५० लाख भाविकांनी पवित्र संगमावर स्नान केल्याचं वृत्त आकाशवाणीच्या वार्ताहरानं दिलं आहे.

प्रयागराजमध्ये होणारा महाकुंभ हा जगातला सर्वात मोठा सांस्कृतिक आणि आध्यात्मिक मेळावा असून त्यात ४५ कोटींहून अधिक भाविक उपस्थित राहण्याची अपेक्षा आहे. भाविकांच्या सुरक्षिततेसाठी महाकुंभ नगरमधील मंदिरं आणि प्रमुख स्थळांवर सुरक्षा व्यवस्था मजबूत करण्यात आली आहे. या ठिकाणी सात थरांची सुरक्षा व्यवस्था ठेवण्यात आली आहे. पोलिसांनी

पाण्याखाली ड्रोन आणि एआय-सक्षम कॅमेऱ्यांसह प्रगत तंत्रज्ञानाची मदत घेतली आहे. प्रयागराजला ये-जा करणाऱ्या लाखो भाविकांचा प्रवास सुरक्षित व्हावा म्हणून रेल्वेच्या तीन हजार ३०० विशेष गाड्यांसह १० हजारपेक्षा जास्त गाड्या धावत आहेत. पायाभूत सुविधांची निर्मिती, सुरक्षा, स्वच्छता, आरोग्य, पाणीपुरवठा, वीजपुरवठा आणि इतर गोष्टींवर प्रशासनानं विशेष भर दिला आहे. अशी माहिती आकाशवाणीच्या प्रतिनिधीनं दिली आहे.

<><><><><>

मकरसंक्रांतीचं पर्व देशभरात उत्साहाने सुरु झालं. आज संक्रांतीचा आदला दिवस. देशाच्या विविध भागात विविध नावांनी हा सुगीचा उत्सव साजरा केला जातो. पंजाब, हरयाणा आणि उत्तर भारतात लोहडी, ईशान्य आणि पूर्वेकडच्या राज्यांमधे माघ बिहू, महाराष्ट्र आणि तेलंगणात भोगी म्हणून साजरा केला जातो. गुजरातमधे उत्तरायणानिमित्त आंतरराष्ट्रीय पतंग महोत्सवाचं आयोजन करण्यात आलं आहे. गेल्या शुक्रवारी गुजरातचे मुख्यमंत्री भूपेंद्र पटेल यांच्या हस्ते महोत्सवाचं उद्घाटन झालं. अहमदाबाद, वडोदरा, सुरत, राजकोट, धोरडो, शिवराजपूर समुद्रकिनारा आणि स्टॅच्यू ऑफ युनिटी अशा विविध ठिकाणी एकाच वेळी हा महोत्सव होत आहे. सावधानता आणि जिगिषा अशी यंदाची संकल्पना असून ४७ देशांमधून मिळून १४३ पतंगबाज या महोत्सवासाठी आले आहेत. महाराष्ट्रातही संक्रांतीनिमित्त खरेदीचा उत्साह दिसत आहे. तीळ गूळ हलव्याचे दागिने, तसंच विविध आकारांचे रंगीबेरंगी पतंग अशा वस्तूंनी बाजार फुलले आहेत.

**<><><><><>**

राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू, उपराष्ट्रपती जगदीप धनखड यांनी आज साजऱ्या होत असलेल्या लोहडी तसंच उद्या देशाच्या विविध भागात साजऱ्या होणाऱ्या मकर संक्रांत, पोंगल, माघ बिहू या सणानिमित्त देशवासीयांना शुभेच्छा दिल्या आहेत.

देशाच्या समृद्ध सांस्कृतिक वारशाचे प्रतिक असणारे हे सण, सर्वांच्या जीवनात उत्साह आणि आनंद घेऊन येवोत, असं राष्ट्रपतींनी आपल्या संदेशात म्हटलं आहे.

लोहडी आणि माघ बिहू निमित्त प्रज्वलित केला जाणाऱ्या अग्नीच्या पवित्र ज्वाला सगळ्यांच्या आयुष्यातील अडचणी दूर करतील आणि संक्रांतीनिमित्त आकाशात भिरभिरणारे पतंग सर्वांची मनं आनंदानं भरून टाकतील, अशी कामना उपराष्ट्रपतींनी केली आहे.

हे सण देशबांधवांना आनंद आणि समृद्धी देतील अशा शब्दात केंद्रीय मंत्री अमित शहा यांनी शुभेच्छा दिल्या आहेत.

**<><><><><>**

खो-खो विश्वचषक २०२५ला आजपासून नवी दिल्लीतल्या इंदिरा गांधी मैदानावर सुरुवात होणार आहे. या स्पर्धेत २० पुरुष संघ तर १९ महिला संघ सहभागी होत आहेत. आज या स्पर्धेत भारतीय पुरुष संघाचा पहिला सामना नेपाळविरुद्ध होणार आहे. हा सामना रात्री साडे आठ वाजता हा सामना सुरू होणार असून दूरदर्शन स्पोर्ट्स वाहिनीवर त्याचं थेट प्रक्षेपण

पाहता येईल. पुरुष संघाचं नेतृत्व प्रतीक वायकर करत असून प्रियांका इंगळे ही महिला संघाची कर्णधार आहे. या विश्वचषक स्पर्धेचा अंतिम सामना १९ जानेवारी रोजी होणार आहे.

**<><><><>**

महिला हॉकी इंडिया स्पर्धेत आज जेएसडब्ल्यू सूरमा हॉकी क्लब विरुद्ध श्राची रार बंगाल टायगर्स या संघांमध्ये सामना होणार आहे. हा सामना मरंग गोमके जयपाल सिंग मुंडा मैदानावर संध्याकाळी सहा वाजता सुरू होईल. काल या स्पर्धेला सुरुवात झाली असून सलामीच्या लढतीत ओदिशा वॉरियर्सने दिल्ली एसजी पायपर्सचा ४-० असा पराभव केला. पुरुषांच्या हॉकी स्पर्धेत आज संध्याकाळी तामिळनाडू ड्रॅगन्सचा सामना दिल्ली एसजी पायपर्स संघाशी होणार आहे. राऊरकेला इथल्या बिरसा मुंडा हॉकी मैदानावर रात्री सव्वा आठ वाजता सामना सुरू होईल.

**<><><><>**

विजय हजारे क्रिकेट करंडक स्पर्धेत हरियाणा, कर्नाटक, विदर्भ आणि महाराष्ट्र या राज्यांचे संघ उपांत्य फेरीत पोहोचले आहेत. काल झालेल्या उपांत्यपूर्व फेरीच्या सामन्यांमध्ये हरियाणाने गुजरातच्या संघाचा २ गडी राखून पराभव केला तर विदर्भ संघाने राजस्थानच्या संघाचा ९ गडी राखून पराभव केला. उद्या आणि परवा उपांत्य फेरीचे सामने खेळवले जाणार असून १८ जानेवारीला वडोदरा इथे स्पर्धेचा अंतिम सामना होणार आहे.

**//<><><><><>//**